**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोननं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्सनं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - थकित - २०२०/२०२०-२१/०६/वेतनपथक, पुणे दिनांक - ११ नोव्हेंबर, २०२०

प्रति,

प्राचार्य,
यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे

**विषय – न्यायालयीन प्रकरणातील थकित रक्कमा अदा करणेबाबत.**

या विभागाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक कर्मचा-यांना न्यायालयाच्या आदेशानुसार देय असलेली फरकाची रक्कम अदा करावयाची आहे त्यांची कर्मचारीनिहाय यादी सोबत जोडलेली आहे. सदरहू रक्कम संबंधीत कर्मचा-यांना अदा करण्यापूर्वी खाली नमूद केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

१. या पत्रान्वये मंजूर करण्यात आलेले अनुदान हे सशर्त अनुदान आहे.
२. या पत्रान्वये मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेबाबत आयकर अधिनियमातील सध्याचे प्रचलीत नियम लक्षात घेऊन आयकर कपातीविषयक योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.
३. या पत्रान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम यापूर्वी जर अदा केली असल्यास या पत्रान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम संबंधीत कर्मचा-यास पुन्हा अदा करण्यात येऊ नये.
४. या पत्रान्वये मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेचे वितरण करण्यापूर्वी संबंधीतांना रक्कम देय असल्याबाबत आणि याबाबतची परिगणना अचूक असल्याबाबतची खात्री करण्यात यावी.
५. ज्या बाबीसाठी थकित रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे त्याच बाबींवर खर्च करण्यात यावी. इतर कोणत्याही बाबीवर सदरहू रक्कम खर्च करण्यात येऊ नये.
६. सदर रक्कम संबंधितांस तात्काळ अदा करुन याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र माहे नोव्हेंबर, २०२० च्या वेतन देयकासोबत सादर करण्यात यावे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | अध्यापकाचे नांव | मंजूर रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे | श्री. सुनिल गणपत पवार | १९४८७४५ |
| | | श्री. हरिष पंढरीनाथ देशमुख | २६९७४१ |
| | | **एकूण** | **२२१८४८६** |

**सही/-**
(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे